नियमित दिवाणी दावा क्रमांक ७०/२०१४

नि ३१ वरील आदेश

प्रतिवादी क्रं. १ ने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे तूर्तातूर्त मनाई मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०२. प्रतिवादी क्रं.१ चे कथन असे आहे की, दावा मिळकतीमध्ये सन १९७७ पूर्वीपासून प्रतिवादी नं.४,६ ते ८ यांचे घर मिळकती आहेत. प्रतिवादी हे सदर दावा मिळकतीमध्ये मालकी हक्काने कब्जे वहिवाटीस व राहणेस आहेत. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सन १९७७ च्या पूर्वी तोंडी वाटण्या झालेल्या आहेत. प्रतिवादी नं.४, ६ ते ८ यांनी सन १९७७ सालापूर्वी आपापले क्षेत्रामध्ये घर बांधकाम केले आहे. त्याप्रमाणे ७/१२ पत्रकी घरे व पड अशी नोंद आहे. सदर नोंद ७/१२ पत्रकी १९७७ पूर्वीपासून आहे. त्याबाबत वादीची कोणतीही तकार अथवा हरकत नाही. प्रतिवादीच्या घर मिळकतीच्या विरुध्द वादीने कोणतीही दाद मागितलेली नाही. त्यामुळे वादी सत्य परीस्थिती न्यायालयापासून लपवत आहे.

०३. तो पुढे असे कथन करतो की, दावा मिळकतीमध्ये वादीच बांधकाम करत आहे. त्याबाबत वादीने कोणताही मजकूर दाव्यामध्ये नमूद केलेला नाही. दावा मिळकतीमध्ये वादी 'मध्य' भागात बांधकाम करत आहे. दावा मिळकतीमधील वादीचे

बांधकाम तात्काळ थांबवणे आवश्यक आहे. बांधकाम न थांबवल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. त्याला सकृतदर्शनी केस आहे. न्यायाचे समतोलत्व त्याचे बाजूने आहे. सबब, दावा मिळकतीमध्ये वादीने कोणतेही बांधकाम करु नये असा वादी व तर्फे इसमांविरुध्द तूर्तातूर्त मनाई आदेश व्हावा अशी विनंती त्याने केली.

०४. वादीने प्रतिवादी नं.१ च्या प्रस्तुत अर्जास नि.४० वर त्याचे म्हणणे देउन प्रस्तुत अर्जातील सर्व मजकूर खोटा, चुकीचा असलेमुळे तो त्याला मान्य नसलेचे कथन केले आहे. प्रस्तुत अर्ज कायदयातील तरतुदीप्रमाणे चालणेस पात्र नाही. प्रतिवादीस प्रस्तुत अर्ज देणेचा कायदेशीर अधिकार नाही. गट नं.६५० या दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी नं.४,६ ते ८ यांच्या घर मिळकती नव्हत्या व नाहीत. प्रतिवादीने नमूद केलेले वाटप नेमके केंव्हा झाले, कोणासमोर झाले व वादी व प्रतिवादी यांना नेमके किती व कोठे क्षेत्र आले हे स्पष्टपणे नमूद केलेले नाही. दावा मिळकत गट नं.६५० मध्ये कोणाचीही घरे नसल्यामुळे त्याबाबत दाद मागण्याचा प्रश्न येत नाही.

०५. तो पुढे असे कथन करतो की, प्रतिवादी नं.१ च्या तथाकथित कथनानुसार व वादीच्या कोणत्याही हक्कास बाधा न येता प्रतिवादीचे म्हणणेप्रमाणे दावा मिळकत गट नं.६५० चे वाटप झाले असलेस तुटक क्षेत्रात बांधकाम करणेस प्रतिवादीने हरकत करणेचा प्रश्नच येत नाही. वादाकरीता प्रतिवादीच्या म्हणण्यानुसार वादी दावा मिळकत

गट नं.६५० चे मध्यभागी बांधकाम करत असलेस प्रतिवादीने त्यास का विरोध केला नाही तसेच स्वतंत्र दावा का दाखल केला नाही याचा खुलासा केला नाही.

०६.	तो पुढे असे कथन करतो की, प्रतिवादीने वादी नेमके किती क्षेत्रामध्ये बांधकाम करत आहे याची मोजमापे व नकाशा नमूद केलेला नाही. प्रतिवादी नं.१ ने महत्वाच्या दादी मागितल्या नसल्यामुळे सदरचा अर्ज कायदयाने मंजूर करता येणार नाही. सबब, प्रतिवादीचा मनाईचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती त्याने केली.

०७.	उभय पक्षकारांनी केलेल्या कथनांवरुन खालील मुद्दे विचारांसाठी उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे देत आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | प्रतिवादी नं.१ हे त्यांना सकृतदर्शनी बाजू असल्याचे सिध्द करतात काय ? | - नकारार्थी- |
| ०२. | प्रतिवादी नं.१ हे न्यायाचा तराजू त्यांच्या बाजूने असल्याचे सिध्द करतात काय ? | -नकारार्थी- |
| 3 | प्रतिवादी नं.१ हे तूर्तातूर्त मनाई हुकूम न मिळाल्यास त्यांची अपरिमित हानी होईल हे सिध्द करतात काय ? | -नकारार्थी- |
| ०४ | प्रतिवादी नं.१ हे त्यांनी मागितलेली दाद मिळणेस | -नकारार्थी |

पात्र आहेत काय ?

०५	आदेश काय ?		-अंतिम आदेशानुसार-

## का र ण मि मां सा

### मुद्दा क्रमांक १ ते ५ बाबत एकत्रीतपणे –

०८.	प्रस्तुतकामी वादीतर्फे विधिज्ञ श्री. एच.पी. रणदिवे व प्रतिवादी क्रं.१ तर्फे विधिज्ञ श्री. सी.एस. शिखरे यांचा युक्तिवाद केला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

०९.	प्रस्तुत कामी वादीने प्रतिवादींविरुध्द सरसनिरस मानाने वाटप व मनाईकरीता दावा दाखल केलेला असून नि.५ कडे प्रस्तुतचा मनाई अर्ज दाखल केलेला आहे. वादीने दावा कलम १ मध्ये मिळकतीचे वर्णन नमूद केलेले आहे व त्यामध्ये प्रतिवादी करत असलेले आर.सी.सी. बांधकाम हे दावेचा विषय असलेचे कथन केले आहे.

१०.	वादीने कागद यादी नि.क्रं.३ ने अ.क्रं.१ लगत दाखल केलेला ७/१२ चा उतारा पाहिला असता गट नं.६५० मध्ये वादी व प्रतिवादी यांचा आणेवारी हिस्सा असलेचे दिसून येते. महत्वाची बाब म्हणजे वादी व प्रतिवादी यांनी परस्परांच्या बांधकामाची छायाचित्रे दाखल केलेली आहेत. यावरुन उभय पक्षकार कथन करत

असलेली बांधकामे त्याच गटातील आहेत हे निव्वळ छायाचित्रांवरुन स्पष्ट होत नाही. या अनुषंगाने वादी प्रतिवादींचे मोजणी अर्ज निकाली काढणेत आलेले आहेत. दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी हे कोठे बांधकाम करत आहेत हे मोजणीशिवाय स्पष्ट होत नसलेमुळे त्या दोघांनीही परस्परांविरुध्द मनाई हुकूम मागितला असला तरीदेखील मोजणी होउन सविस्तर परिस्थिती न्यायालयापुढे आणल्याशिवाय मनाईबाबत भाष्य करणे अयोग्य ठरते.

११.	याठिकाणी नोंद घेणेसारखी बाब म्हणजे वादी व प्रतिवादीने परस्परांविरुध्द मनाई हुकूम मागितलेला आहे परंतु दोघांचीही बांधकामे ही स्वतंत्र जागेत असून दोन्हीही बांधकामे ही एकमेकांच्या चतुःसीमेत येत नाही. अशा परिस्थितीत केवळ परस्परांना शह देणेसाठी मनाई अर्ज दाखल झालेचे दिसून येते. दावेचे स्वरुप पाहता वादीने दावा वाटपाबाबत केलेला आहे आणि वादी प्रतिवादींमध्ये वाटप झालेले नाही अशी हकिकत ते घेउन आलेले आहेत. सद्यपरिस्थितीला न्यायालयासमोर वाटपाबाबत कोणताही सबळ पुरावा अथवा कागदपत्रे नसलेमुळे वादी व प्रतिवादींना मनाई देणे उचित ठरत नाही असेच दिसून येते.

१२.	वादी व प्रतिवादीतर्फे त्यांच्या कथनांच्या पुष्टर्थ न्यायनिवाडे दाखल करणेत आलेले आहेत. प्रतिवादी क्रं.१ ने दाखल केलेल्या नि.३४ लगतच्या कैफियतीचा विचार

करता त्याने कैफियतीमध्ये वादीविरुध्द कोणतीही मनाई मागितलेली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादीने मूळ कैफियतीमध्ये वादीविरुध्द मनाई मागितलेली नाही. त्याही कारणास्तव त्याने दाखल केलेल्या मनाई अर्जाचा विचार करणे रास्त ठरत नाही. याबाबत वादीतर्फे मा. उच्च न्यायालय, राजस्थानचा ***Prem Chand Vs. Manak Chand reported in 1997 CJ(Raj) 349*** पुढीप्रमाणे न्यायनिवाडा दाखल केला आहे. त्यामधील परीच्छेद क्रं.३ व ६ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे –

> “3......... The Court has no jurisdiction to grant by way of interim relief what could never be granted in the main suit itself. Thus an interim injunction granted during the pendency of a suit should not be a greater scope than what could be granted in the suit. Plaintiff who seeks temporary injunction should not only show the prima facie case and balance of convenience but also ir(sic)parable injury and also that the case falls within he exceptional category of cases wherein the Courts should intervene immediately in granting relief which may in fact, cover the entire relief that should have been granted in the suit itself.”
>
> “6........ The plaintiffs are not entitled to such interim relief which has not been sought in the main suit.”

सदरच्या न्यायनिवाडयातील परिच्छेद क्रं.३ व ६ मधील वरील मजकूर पाहता, मूळ दावेत अथवा प्लीडींगमध्ये जर मनाईची मागणी नसेल तर तूर्तातूर्त मनाई अर्जात मनाई मागता येत नाही असे स्पष्टपणे दिसून येते. याकामी वादीतर्फे दाखल करणेत आलेले इतर न्यायनिवाडे हे वस्तुस्थितीचे अनुषंगाने माझेसमोरच्या प्रकरणास लागू होत नसलेमुळे त्याबाबत कोणतेही विवेचन केलेले नाही.

१३.      प्रतिवादीने दाखल केलेला ***Prakash S. Akotkar v. Mansoorkha Gulabkha reported in AIR 1996 Bombay 36*** न्यायनिवाडा हा देखील प्रस्तुत प्रकरणास लागू होत असलेचे दिसून येतो.  त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने काढलेला निष्कर्ष हा माझे समोरच्या प्रकरणास लागू होत असलेचे दिसून येते.

> “Civil P.V. (1908), O. 39, Rr. 1, 2 – Injunction – Grant of – Co-owner in possession of property for and on behalf of other co-owners – Cannot claim injunction against other co-owners restraining them from interfering with his possession and enjoyment of suit property so as to exclude them from exercising their right as co-owner.”

सदरच्या न्यायनिवाडयाच्या अनुसार एक सहहिस्सेदार दुस–या सहहिस्सेदाराविरुध्द त्याला त्याच्या हिस्सेचा ताबा व भोगवटा यास हरकत होईल अशारीतीने मनाई मागू शकत नाही असा निष्कर्ष काढलेचे दिसून येत आहे.  माझेसमोरच्या प्रकरणात देखील वादी व प्रतिवादी हे गट नं.६५० मध्ये परस्परांचे सह हिस्सेदार आहेत. अशाप्रकारे वादी व प्रतिवादी उपरोक्त गटामध्ये त्यांचा हिस्सा असताना मनाई मागू शकत नाही या मताचा मी आहे.

१४.      वादी व प्रतिवादींचे बांधकाम पाहता ते ब–याच अंशी पूर्ण झालेचे दिसून येते. अशा परिस्थितीत उभय पक्षकारांनी जागरुकता दाखवून बांधकाम सुरु होणेपूर्वीच न्यायालयाकडे दाद मागणेसाठी येणे आवश्यक होते परंतु तसे दिसून येत नाही.  बांधकाम ब–याच अंशी पूर्ण झालेले असलेमुळे वादी व प्रतिवादी हे परस्परांविरुध्द मागत असलेली

दाद सद्हेतूने मागत असलेचे दिसून येत नाही. या कारणामुळे मनाई न दिलेस उभय पक्षकारांची कोणतीही अपरिमित हानी होणार नाही असे दिसून येत आहे. उभय पक्षकारांचा तूर्तातूर्त मनाई अर्ज नामंजूर करणेच्या निष्कर्षाप्रत आलो आहे. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक १ ते ४ ची उत्तरे नकारार्थी देउन मुद्दा क्रमांक ५ च्या उत्तरात पुढीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आ दे श

०१. प्रतिवादी क्रं.१ चा नि.३१ लगतचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

०२. प्रतिवादी क्रं.१ ने प्रस्तुत अर्जाचा खर्च स्वतः सोसणेचा आहे.

सही/– १४/०६/२०१४

दिनांक १४/०६/२०१४

( अ. र. माळवदे )
दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, पेठ वडगांव,
ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.